श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

रास पंचाध्याय (10.33)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्॥

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्॥

श्रीमद्भागवतमहापुराणम्

दशमः स्कंधः

अथ त्रयस्त्रिंशोऽध्यायः

श्रीशुक उवाच

इत्थं(म्) भगवतो गोप्यः(श्), श्रुत्वा वाचः(स्) सुपेशलाः ।
जहुर्विरहजं(न्) तापं(न्), तदङ्गोपचिताशिषः ॥ 1॥

तदङ्गो+ पचिताशिषः

श्री शुकाचार्य म्हणतात-भगवंतांची ही सुमधुर वाणी ऐकून गोपींचा विरहजन्य ताप संपला आणि त्यांचे प्रेम मिळाल्याने गोपींचे मनोगत पूर्ण झाले. ॥ 1 ॥

तत्रारभत गोविन्दो, रासक्रीडामनुव्रतैः ।
स्त्रीरत्नैरन्वितः(फ्) प्रीतै- रन्योन्याबद्धबाहुभिः ॥ 2॥

स्त्री+ रत्नै+ रन्वितः(फ्), रन्योन् + याबद्ध+ बाहुभिः

भगवान श्रीकृष्णांच्या प्रेयसी आणि सेविका गोपी एकमेकींच्या हातात हात घालून उभ्या होत्या. त्या स्त्रीरत्नांच्या बरोबर भगवंतांनी रास क्रीडा सुरू केली.॥ 2 ॥

रासोत्सवः(स्) सम्प्रवृत्तो, गोपीमण्डलमण्डितः ।

योगेश्वरेण कृष्णेन, तासां(म्) मध्ये द्वयोर्द्वयोः ।

प्रविष्टेन गृहीतानां(ङ्), कण्ठे स्वनिकटं(म्) स्त्रियः ॥ 3॥

द्वयोर् + द्वयोः

यं(म्) मन्येरन् नभस्तावद्- विमानशतसं(ङ्)कुलम् ।

दिवौकसां(म्) सदाराणा- मौत्सुक्यापहृतात्मनाम् ॥ 4॥

मौत्सुक्या+ पहृतात्+ मनाम्

योगेश्वर भगवान श्रीकृष्ण दोन दोन गोपींच्या मध्ये प्रगट झाले आणि त्यांच्या गळ्यात त्यांनी आपला हात टाकला. प्रत्येक गोपीला असा अनुभव येत होता की, श्रीकृष्ण केवळ आपल्याजवळ आहेत. अशा प्रकारे अनेक गोपींच्या समूहात श्रीकृष्णांचा रासोत्सव सुरू झाला. त्यावेळी आकाशामध्ये शेकडो विमानांची गर्दी झाली होती. रासोत्सवाच्या दर्शनाच्या उत्सुकतेमुळे स्वतःला विसरलेले सर्व देव आपापल्या पत्नीसह तेथे येऊन पोहोचले. ॥ 3-4 ॥

ततो दुन्दुभयो नेदुर्- निपेतुः(फ्) पुष्पवृष्टयः ।

जगुर्गन्धर्वपतयः(स्), सस्त्रीकास्तद्यशोऽमलम् ॥ 5॥

जगुर्+ गन्धर्व+ पतयः(स्), सस्त्रीकास्+ तद्यशोऽ+ मलम्

स्वर्गातील दुंदुभी वाजू लागल्या. स्वर्गीय पुष्पांचा वर्षाव होऊ लागला. गंधर्वगण आपापल्या पत्नींसह भगवंताच्या निर्मल यशाचे गायन करू लागले. ॥ 5 ॥

वलयानां(न्) नूपुराणां(ङ्), किं(ङ्)किणीनां(ञ्) च योषिताम् ।

सप्रियाणामभूच्छब्दस्- तुमुलो रासमण्डले ॥ 6॥

सप्रियाणा+ मभूच्+ छब्दस्

सर्व गोपी रास मंडळामध्ये आपल्या प्रियतमासह नृत्य करू लागल्या. त्यांच्या बांगड्या, पैंजण आणि कमरपट्ट्याचे घुंगरू या सर्वांचा प्रचंड आवाज होऊ लागला. ॥ 6 ॥

तत्रातिशुशुभे ताभिर्- भगवान् देवकीसुतः ।

मध्ये मणीनां(म्) हैमानां(म्), महामरकतो यथा ॥ 7॥

महा+ मरकतो

तेथे व्रजसुंदरीच्यामध्ये भगवान श्रीकृष्ण अगणित पिवळ्या धमक सुवर्णमण्यांमध्ये तेजस्वी मोठा नीलमणी चमकावत असे दिसत होते. ॥ 7 ॥

पादन्यासैर्भुजविधुतिभिः(स्) सस्मितैर्भ्रूविलासैर्-
भज्यन्मध्यैश्चलकुचपटैः(ख्) कुण्डलैर्गण्डलोलैः ।
स्विद्यन्मुख्यः(ख्) कबररशनाग्रन्थयः(ख्) कृष्णवध्वो,
गायन्त्यस्तं(न्) तडित इव ता मेघचक्रे विरेजुः ॥ 8॥

पादन्यासैर् + भुज+ विधुतिभिः(स्), सस्मितैर्+ भ्रूविलासैर्

भज्यन्+ मध्यैश्+ चलकुचपटैः(ख्), कुण्डलैर्+ गण्डलोलैः

स्विद्यन्+ मुख्यः(ख्), कबर+ रशना+ ग्रन्थयः(ख्), गायन्+ त्यस्तं(न्)

नृत्याच्या वेळी गोपी निरनिराळ्या तर्हेच्या पायांच्या हालचाली व हातांचे हावभाव करीत, मधून मधून स्मितपूर्वक भुवयांचे विलास करीत, कंबर लचकावीत. कधी त्यांच्या छातीवरील दुपट्टे येईल हेलकावे घेत तर कधी कुंडले गालावर आपटत. चेहऱ्यावर घामाचे थेंब तरारले होते आणि वेण्या सैल झाल्या होत्या. याचवेळी त्या गातही होत्या. मेघ मंडलांत विजा शोभाव्या, तशा श्रीकृष्णाच्या सानिध्यात त्या शोभत होत्या.॥ 8॥

उच्चैर्जगुर्नृत्यमाना, रक्तकण्ठ्यो रतिप्रियाः ।
कृष्णाभिमर्शमुदिता, यद्गीतेनेदमावृतम् ॥ 9॥

उच्चैर् + जगुर्नृत्य+ माना, कृष्णा+ भिमर्श+ मुदिता, यद्+ गीतेने+ दमावृतम्

त्या प्रेममग्न गोपिका नाचत -नाचत उंच स्वरात रागदारीत मधुर गायन करीत होत्या. श्रीकृष्णांच्या स्पर्शामुळे त्या अधिकच आनंदमग्न झाल्या होत्या. त्यांच्या गायनाने हे सर्व जग अजूनही गुंजन करीत आहे. ॥ 9 ॥

काचित् समं(म्) मुकुन्देन, स्वरजातीरमिश्रिताः ।
उन्निन्ये पूजिता तेन, प्रीयता साधु साध्विति ।
तदेव ध्रुवमुन्निन्ये, तस्यै मानं(ञ्) च बह्वदात्॥ 10॥

स्व+ रजाती+ रमिश्रिताः,ध्रुव+ मुन्निन्ये,

एक गोपी भगवंतांच्या बरोबर त्यांच्या स्वरात स्वर मिळून गात होती. ती त्यांच्यापेक्षाही वरच्या स्वरात गाऊ लागली. तेव्हा प्रसन्न होऊन त्यांनी तिला "वाहवा! वाहवा!!"म्हणून शाबासकी दिली. दुसरीने तोच राग ध्रुपदतालात गाइला. त्याची सुद्धा भगवंतांनी अतिशय कौतुक केले. ॥ 10 ॥

काचिद् रासपरिश्रान्ता, पार्श्वस्थस्य गदाभृतः ।
जग्राह बाहुना स्कन्धं(म्), श्लथद्वलयमल्लिका ॥ 11॥

पार्श्वस्+ थस्य, श्लथद्+ वलय+ मल्लिका

एक गोपी नृत्य करता करता थकून गेली. तिच्या मनगटातून बांगड्या आणि वेणीतून मोगऱ्याची फुले गळू लागली. तेव्हा तिने शेजारीच उभे असलेल्या मुरली- मनोहरांचा खांदा आपल्या हाताने धरून ठेवला. ॥ 11 ॥

तत्रैकां(म्)सगतं(म्) बाहुं(ङ्), कृष्णस्योत्पलसौरभम् ।

चन्दनालिप्तमाघ्राय, हृष्टरोमा चुचुम्ब ह ॥ 12॥

कृष्णस् + योत्पल+ सौरभम्, चन्दना+ लिप्त+ माघ्राय

नाचताना एक गोपीचे कुंडल हालत होते, त्याच्या कांतीने तिचा गाल चमकत होता. तिने आपला गाल श्रीकृष्णांच्या गालाला लावला, तेव्हा भगवंतांनी आपल्या तोंडातील चावलेला विडा तिच्या तोंडात दिला.॥ 12 ॥

कस्याश्चिन्नाट्यविक्षिप्त- कुण्डलत्विषमण्डितम् ।

गण्डं(ङ्) गण्डे सन्दधत्या, अदात्ताम्बूलचर्वितम् ॥ 13॥

कस्याश् + चिन्नाट्य+ विक्षिप्त, कुण्डलत्+ विषमण्डितम्, अदात्+ ताम्बू+ लचर्वितम्

नाचताना एका गोपीचे कुंडल हलत होते, त्याच्या कांतीने तिचा गाल चमकत होता. तिने आपला गाल श्रीकृष्णांच्या गालाला लावला, तेव्हा भगवंतांनी आपल्या तोंडातील चावलेला विडा तिच्या तोंडात दिला. ॥ 13 ॥

नृत्यन्ती गायती काचित्- कूजन्नूपुरमेखला ।

पार्श्वस्थाच्युतहस्ताब्जं(म्), श्रान्ताधात् स्तनयोः(श्) शिवम् ॥ 14॥

कूजन्+ नूपुर+ मेखला, पार्श्वस्+ थाच्युत+ हस्ताब्जं(म्)

एक गोपी पैंजणांचा आणि कमरपट्ट्याच्या घुंगरांचा नाद करीत नाचत आणि गात होती. ती जेव्हा थकून गेली, केव्हा तिने आपल्या शेजारीच उभे असलेल्या श्यामसुंदरांचा मंगल हात आपल्या दोन्ही स्तनांवर ठेवून घेतला. ॥ 14 ॥

गोप्यो लब्ध्वाच्युतं(ङ्) कान्तं(म्), श्रिय एकान्तवल्लभम् ।

गृहीतकण्ठ्यस्तद्दोर्भ्यां(ङ्), गायन्त्यस्तं(वँ) विजह्रिरे ॥ 15॥

गृही+ तकण्ठ्यस्+ तद्+ दोर्भ्यां(ङ्)

लक्ष्मीचाच केवळ पती असणाऱ्या श्रीकृष्णांना आपला प्रिय तम करून घेऊन, गोपी गायन करीत त्यांच्याबरोबर विहार करू लागल्या. यावेळी श्री कृष्णांनी आणि त्यांच्या गळ्यात आपले हात घातले होते.॥ 15 ॥

कर्णोत्पलालकविटं(ङ्)ककपोलघर्म-

वक्त्रश्रियो वलयनूपुरघोषवाद्यैः ।

गोप्यः(स्) समं(म्) भगवता ननृतुः(स्) स्वकेश-

स्रस्तस्रजो भ्रमरगायकरासगोष्ठ्याम् ॥ 16॥

कर्णोत् + पलाल+ कविटं(ङ्)+ ककपो+ लघर्म, वलयनू+ पुरघो+ षवाद्यैः,

स्रस्+ तस्रजो, भ्रमरगा+ यकरा+ सगोष्ठ्याम्

कानावरील कमळे, गालावर रुळणारे कुरळे केस आणि घामाचे बिंदू यांनी ज्यांचे मुखकमले शोभत आहेत, अशा गोपी भ्रमर गायक असणाऱ्या रासमंडलामध्ये श्रीकृष्णांच्याबरोबर नृत्य करीत होत्या. त्यावेळी त्यांच्या बांगड्या, पैंजण आणि अन्य वाद्ये वाजत होती. तसेच त्यांच्या वेण्यांमध्ये गुंफलेली फुले इतस्ततः विखरून पडत होती.॥ 16 ॥

एवं(म्) परिष्वङ्गकराभिमर्श-

स्निग्धेक्षणोद्दामविलासहासैः ।

रेमे रमेशो व्रजसुन्दरीभिर्-

यथार्भकः(स्) स्वप्रतिबिम्बविभ्रमः ॥ 17॥

परिष्वङ्+ गकराभिमर्श, स्निग्धे+ क्षणोद्+ दामविला+ सहासैः, स्वप्रतिबिम् + बविभ्रमः

लहान मुलाने आपल्याच प्रतिबिंबाशी खेळावे त्याचप्रमाणे रमा रमण आपलीच प्रतिबिंबे असणाऱ्या त्यांना कधी छातीशी धरीत, कधी हाताने कुरवाळीत, कधी प्रेमपूर्ण नजरेने त्यांच्याकडे पहात तर कधी लीलेने मोठ्याने हसत. अशाप्रकारे त्यांनी व्रजसुंदरींबरोबर क्रीडा केली. ॥ 17 ॥

तदङ्गसङ्गप्रमुदाकुलेन्द्रियाः(ख्),

केशान् दुकूलं(ङ्) कुचपट्टिकां(वँ) वा ।

नाञ्जः(फ्) प्रतिव्योढुमलं(वँ) व्रजस्त्रियो,

विस्रस्तमालाभरणाः(ख्) कुरूद्वह ॥ 18॥

तदङ्+ गसङ्ग+ प्रमुदा+ कुलेन्द्रियाः(ख्), विस्रस्+ तमाला+ भरणाः(ख्)

परीक्षिता! भगवंतांच्या अंगाच्या स्पर्शाने झालेल्या आनंदाने गोपी भान विसरल्या, फुलांचे हार तुटले. दागिने अस्ताव्यस्त झाले. त्या आपली विस्कटलेले केस, वस्त्रे आणि चोळ्या सुद्धा सांभाळण्यास असमर्थ झाल्या. ॥ 18 ॥

कृष्णविक्रीडितं(वँ) वीक्ष्य, मुमुहुः(ख्) खेचरस्त्रियः ।

कामार्दिताः(श्) शशां(ङ्)कश्च, सगणो विस्मितोऽभवत् ॥ 19॥

कृष्ण+ विक्रीडितं(वँ), खेचर+ स्त्रियः

श्रीकृष्णांची ही रास क्रीडा पाहून स्वर्गातील देवांगनासुद्धा काम- मोहित झाल्या आणि नक्षत्रांसह चंद्र सुद्धा चकित झाला. ॥ 19 ॥

कृत्वा तावन्तमात्मानं(यँ), यावतीर्गोपयोषितः ।

रेमे स भगवां(म्)स्ताभि- रात्मारामोऽपि लीलया ॥ 20॥

तावन् + तमात् + मानं(यँ), यावतीर् + गोपयोषितः

जरी भगवान स्वतःतच रमणारे असले, तरीसुद्धा त्यांनी जेवढ्या गोपी होत्या, तेवढीच रूपे सहज धारण केली आणि त्यांच्याबरोबर विहार केला.॥ 20 ॥

तासामतिविहारेण, श्रान्तानां(वँ) वदनानि सः ।

प्रामृजत् करुणः(फ्) प्रेम्णा, शन्तमेनाङ्गपाणिना ॥ 21॥

तासा+ मतिविहारेण, शन्तमेनाङ्+ गपाणिना

हे राजा! जेव्हा पुष्कळ वेळ पर्यंत विहार केल्यामुळे गोपी थकून गेल्या, तेव्हा करुणामय श्री कृष्णांनी प्रेमाने आपल्या सुखद करकमलांनी त्यांच्या चेहऱ्यावरून हात फिरवून त्यांचा क्षीण दूर केला.॥ 21 ॥

गोप्यः(स्) स्फुरत्पुरटकुण्डलकुन्तलत्विड्-

गण्डश्रिया सुधितहासनिरीक्षणेन ।

मानं(न्) दधत्य ऋषभस्य जगुः(ख्) कृतानि

पुण्यानि तत्कररुहस्पर्शप्रमोदाः ॥ 22॥

स्फुरत् + पुरट+ कुण्डल+ कुन्तलत्+ विड्, सुधितहा+ सनिरी+ क्षणेन, तत्कररुहस्+ पर्शप्रमोदाः

भगवंतांच्या नखस्पर्शाने गोपींना अतिशय आनंद झाला. त्यांनी ज्यांच्यावर सोन्याची कुंडली झगमगत होती आणि कुरळे केस भिरभिरत होते, अशा आपल्या गालांच्या सौंदर्याने आणि अमृतासारख्या मधुर हास्ययुक्त नजरेने श्रीकृष्णांचा सन्मान केला आणि त्या प्रभूंच्या पवित्र लीलांचे गायन करू लागले. ॥ 22 ॥

ताभिर्युतः(श्) श्रममपोहितुमङ्गसङ्ग-

घृष्टस्रजः(स्) स कुचकुं(ङ्)कुमरं(ञ्)जितायाः ।

गन्धर्वपालिभिरनुद्रुत आविशद् वाः(श्),

श्रान्तो गजीभिरिभराडिव भिन्नसेतुः ॥ 23॥

श्रम+ मपो+ हितुमङ्+ गसङ्ग, गन्धर्वपा+ लिभिर+ नुद्रुत, गजी+ भिरिभरा+ डिव

यानंतर जसा थकलेला हत्ती किनारे पाडत हत्तीणीं बरोबर पाण्यात शिरून क्रीडा करतो, त्याचप्रमाणे (गुणातीत असल्यामुळे) लोकमर्यादा आणि वेदमर्यादा यांची पर्वा न करणाऱ्या भगवंतांनी थकवा दूर करण्यासाठी गोपींसह यमुनेच्या पाण्यात प्रवेश केला. त्यावेळी भगवंताच्या गळ्यातील वनमाला गोपींचे अंग घासल्याने थोडीशी चुरगळली होती आणि त्यांच्या वक्षः स्थळाच्या केशराचा तिला रंगही लागला होता तिच्या चारी बाजूंनी गुणगुणणारेभुंगे त्यांच्या पाठोपाठ चालले होते. जणू गंधर्वराज त्यांच्या कीर्तीचे गायन करीत पाठोपाठ चालले आहेत. ॥ 23 ॥

सोऽम्भस्यलं(यँ) युवतिभिः(फ्) परिषिच्यमानः(फ्),

प्रेम्णेक्षितः(फ्) प्रहसतीभिरितस्ततोऽङ्ग ।

वैमानिकैः(ख्) कुसुमवर्षिभिरीड्यमानो,

रेमे स्वयं(म्) स्वरतिरत्र गजेन्द्रलीलः ॥ 24॥

सोऽम्भस् + यलं(यँ), प्रहसती+ भिरितस्+ ततोऽङ्ग, कुसुमवर्+ षिभिरी+ ड्यमानो

परीक्षिता! यमुनेच्या पाण्यात गोपींनी प्रेमयुक्त कटाक्षांनी भगवंतांच्याकडे पाहात हसत- हसत त्यांच्यावर इकडून -तिकडून खूप पाणी उडविले. विमानात बसलेल्या देवता फुलांचा वर्षाव करून त्यांची स्तुती करू लागल्या. अशाप्रकारे यमुनेच्या पाण्यात आत्माराम श्रीकृष्णांनी गजराजाप्रमाणे विहार केला.॥ 24 ॥

ततश्च कृष्णोपवने जलस्थले-

प्रसूनगन्धानिलजुष्टदिक्तटे ।

चचार भृङ्गप्रमदागणावृतो

यथा मदच्युद् द्विरदः(ख्) करेणुभिः ॥ 25॥

प्रसू+ नगन्धा+ निलजुष्ट+ दिक्तटे, भृङ्ग+ प्रमदा+ गणावृतो

यानंतर गोपी आणि भुंग्यांच्या थव्यांनी वेढलेले भगवान यमुनातीरावरील उपवनात गेले. ते अत्यंत रमणीय होते. त्यांच्या चारी बाजूंनी पाण्यात आणि जमिनीवर उमललेल्या फुलांचा सुगंध घेऊन मंद मंद वारा वाहत होता. तेथे जसा मदोन्मत्त हत्ती हत्तीणींच्या कळपासह फिरतो, त्याप्रमाणे श्रीकृष्ण त्या वनात विहार करू लागले.॥ 25 ॥

एवं(म्) शशां(ङ्)कां(म्)शुविराजिता निशाः(स्),

स सत्यकामोऽनुरताबलागणः ।

सिषेव आत्मन्यवरुद्धसौरतः(स्),

सर्वाः(श्) शरत्काव्यकथारसाश्रयाः ॥ 26॥

शशां(ङ्)कां(म्)+ शुविराजिता, सत्यकामोऽ+ नुरता+बलागणः,

आत्मन् + यवरुद्ध+ सौरतः(स्), शरत् + काव्यकथा+ रसाश्रयाः

जिच्यामध्ये अनेक रात्री एकत्रित झाल्या होत्या, अशी ती शरद ऋतूतील रात्र चंद्राच्या चांदण्याने सुंदर झाली होती. शरद ऋतुसंबंधी ज्या रसांचे वर्णन काव्यात वाचायला मिळते. त्यानुसारच ती रात्र होती. त्या रात्री सत्यसंकल्प श्रीकृष्णांनी आपल्या प्रेयसी गोपींसह शुद्ध सत्वमय रासक्रीडा करीत अनेक प्रकारे विहार केला.॥ 26 ॥

राजोवाच

सं(म्)स्थापनाय धर्मस्य, प्रशमायेतरस्य च ।

अवतीर्णो हि भगवा- नं(म्)शेन जगदीश्वरः ॥ 27॥

प्रशमा+ येतरस्य

राजाने विचारले-जगाचे स्वामी भगवान यांनी आपला अंश श्री बलरामांसह धर्माची स्थापना आणि अधर्माचा नाश करण्यासाठी अवतार धारण केला होता.॥ 27 ॥

स कथं(न्) धर्मसेतूनां(वँ), वक्ता कर्ताभिरक्षिता ।

प्रतीपमाचरद् ब्रह्मन्, परदाराभिमर्शनम् ॥ 28॥

परदारा+ भिमर्शनम्

ब्रह्मन! ते धर्म मर्यादेचा उपदेश करणारे, स्वतः आचरण करणारे आणि त्या सर्वांचे रक्षण करणारे होते. असे असता त्यांनी स्वतः परस्त्रियांना स्पर्श करण्याचे धर्मविरोधी वर्तन कसे केले?॥ 28 ॥

आप्तकामो यदुपतिः(ख्), कृतवान् वै जुगुप्सितम् ।

किमभिप्राय एतं(न्) नः(स्), सं(म्)शयं(ञ्) छिन्धि सुव्रत ॥ 29॥

जुगुप् + सितम्

भगवान श्रीकृष्णांना कोणतीही इच्छा नव्हती, असे असतानाही त्यांनी कोणत्या उद्देशाने हे अयोग्य कर्म केले? हे ब्रह्मचारी मुनेश्वर! कृपा करून आपण माझा हा संशय दूर करा. ॥ 29 ॥

श्रीशुक उवाच

धर्मव्यतिक्रमो दृष्ट, ईश्वराणां(ञ्) च साहसम् ।

तेजीयसां(न्) न दोषाय, वह्नेः(स्) सर्वभुजो यथा ॥ 30॥

धर्म+ व्यति+ क्रमो

श्रीशुक म्हणतात-अलौकिक पुरुषांची कधीकधी धर्माचे उल्लंघन आणि लौकिक दृष्ट्या अविचारी कृत्यें दिसतात. परंतु ही त्या तेजस्वी पुरुषांना दोषास्पद ठरत नाहीत . जसे, अग्नी सगळे खातो, तू त्यामुळे तो अपवित्र होत नाही.॥ 30 ॥

नैतत् समाचरेज्जातु, मनसापि ह्यनीश्वरः ।

विनश्यत्याचरन् मौढ्या- द्यथा रुद्रोऽब्धिजं(वँ) विषम् ॥ 31॥

समाचरेज्+ जातु, विनश्यत्+ याचरन्

ज्या लोकांच्या अंगी असे सामर्थ्य नसते, त्यांनी मनानेसुद्धा अशा गोष्टी करता कामा नयेत. एखाद्याने मूर्खपणामुळे असे कृत्य केलेच तर त्याचा नाश होतो. जसे भगवान शंकर हलाहल विष प्याले, म्हणून दुसरा कोणी पिईल, तर तो जळून जाईल.॥ 31 ॥

ईश्वराणां(वँ) वचः(स्) सत्यं(न्), तथैवाचरितं(ङ्) क्वचित् ।

तेषां(यँ) यत् स्ववचोयुक्तं(म्), बुद्धिमां(म्)स्तत् समाचरेत् ॥ 32॥

स्व+ वचोयुक्तं(म्)

म्हणून जे थोर आहेत, त्यांचा उपदेश नेहमी सत्य असतो.आणि आचरण काही वेळा सत्य असते; म्हणून बुद्धिमान माणसाने त्यांचे जे आचरण त्यांच्या उपदिशा नुसार असेल तेवढेच आपल्या जीवनात उतरविले पाहिजे.॥ 32 ॥

कुशलाचरितेनैषा- मिहꣳ स्वार्थो न विद्यते ।

विपर्ययेण वानर्थो, निरहं(ङ्)कारिणां(म्) प्रभो ॥ 33॥

कुशला+ चरिते+ नैषा

परीक्षीता! अशा सामर्थ्यवान पुरुषांच्या अंगी 'कर्ताभाव' नसतो. शुभकर्म करण्यामध्ये त्यांचा काहीही स्वार्थ नसतो आणि अशोक कर्म करण्याने त्यांचे काहीही नुकसान होत नाही.॥ 33 ॥

किमुताखिलसत्त्वानां(न्), तिर्यङ्ꣳमर्त्यदिवौकसाम् ।

ईशितुश्चेशितव्यानां(ङ्), कुशलाकुशलान्वयः ॥ 34॥

किमुता+ खिल+ सत्त्वानां(न्), तिर्यङ्+ मर्त्यदिवौ+ कसाम्

ईशितुश् + चेशितव्यानां(ङ्), कुशला+ कुशलान्वयः

असे जर आहे, तर मग जे पशु, पक्षी, मनुष्य, देव इत्यादी सर्व चराचर जीवांचे स्वामी आहेत, त्यांच्याशी मानवाच्या बाबतीतील शुभ आणि अशुभ यांचा संबंध कसा जोडता येईल? ॥ 34 ॥

यत्पादपं(ङ्)कजपरागनिषेवतृप्ता,

योगप्रभावविधुताखिलकर्मबन्धाः ।

स्वैरं(ञ्) चरन्ति मुनयोऽपि न नह्यमानास्-

तत्स्येच्छयाऽऽत्तवपुषः(ख्) कुत एव बन्धः ॥ 35॥

यत्पा+ दपं(ङ्)कजपरा+ गनिषे+ वतृप्ता,

योग+ प्रभाव+ विधुता+ खिलकर्मबन्धाः, तस्येच्+ छयाऽऽत्+ तवपुषः(ख्)

ज्यांच्या चरण कमलांच्या परागांचे सेवन करून भक्तजन तृप्त होतात. ज्यांच्याशी जोडले गेलेले योगी त्यांच्या प्रभावाने आपली सर्व कर्म बंधने तोडून टाकतात आणि ज्यांचे तत्व जाणणारे ज्ञानी पुरुष स्वच्छंदपणे वागूनही कर्मबंधानात अडकत नाहीत, तेच भगवान स्वतःच्या इच्छेने आपले स्वरूप प्रगट करतात, त्यांना कर्मबंधन कोठून असणार? ॥ 35 ॥

गोपीनां(न्) तत्पतीनां(ञ्) च, सर्वेषामेव देहिनाम् ।

योऽन्तश्चरति सोऽध्यक्षः(ख्), क्रीडनेनेह देहभाक् ॥ 36॥

योऽन्तश् + चरति

गोपी, त्यांचे पती आणि सर्व जीव यांच्या अंतकरणामध्ये जे आत्मरुपाणी विराजमान आहेत, जे सर्वांचे साक्षी आहेत, त्यांची देह धारण करणे ही केवळ लिला आहे.॥ 36 ॥

अनुग्रहाय भूतानां(म्), मानुषं(न्) देहमास्थितः ।

भजते तादृशीः(ख्) क्रीडा, याः(श्) श्रुत्वा तत्परो भवेत् ॥ 37॥

देह+ मास्थितः

भगवान (प्रपंच सुखांत रमलेल्या)जीवांवर कृपा करण्यासाठी स्वतःला मनुष्य रूपाने प्रगट करतात आणि तशाच क्रीडा करतात की, ज्या एकूण जीवांनी भगवत्परायण व्हावे.॥ 37 ॥

नासूयन् खलु कृष्णाय, मोहितास्तस्य मायया ।

मन्यमानाः(स्) स्वपार्श्वस्थान्, स्वान् स्वान् दारान् व्रजौकसः ॥ 38॥

स्वपार्श्व+ स्थान्

व्रजवासी गोपानां श्रीकृष्णाबद्दल मुळीच मत्सर वाटला नाही. कारण ते त्यांच्या योगमायेने मोहित होऊन असे समजत होते की, आपल्या पत्नी आपल्या जवळच आहेत.॥ 38 ॥

ब्रह्मरात्र उपावृत्ते, वासुदेवानुमोदिताः ।

अनिच्छन्त्यो ययुर्गोप्यः(स्), स्वगृहान् भगवत्प्रियाः ॥ 39॥

अनिच् + छन्त्यो

ब्राह्ममुहूर्त आला. (पहाट झाली.) आपल्या घरी परत जाण्याची गोपींची जरी इच्छा नव्हती, तरी भगवान श्रीकृष्णांच्या आज्ञेने भगवंतांना प्रिय असणाऱ्या गोपी आपापल्या घरी निघून गेल्या. ॥ 39 ॥

विक्रीडितं(व्ँ) व्रजवधूभिरिदं(ञ्) च विष्णोः(श्),

श्रद्धान्वितोऽनुशृणुयादथ वर्णयेद् यः ।

भक्तिं(म्) परां(म्) भगवति प्रतिलभ्य कामं(म्),

हृद्रोगमाश्वपहिनोत्यचिरेण धीरः ॥ 40॥

व्रजवधू+ भिरिदं(ञ्), श्रद्धान् + वितोऽ+ नुशृणुया+ दथ, हृद्रोगमाश्व+ पहिनोत् + यचिरेण

परीक्षिता! जो ज्ञानी मनुष्य श्रीकृष्णांची गोपी बरोबरची ही रास-लीला श्रद्धेने वारंवार श्रवण करतो आणि तिचे वर्णन करतो, त्याला भगवंताच्या चरणांविषयी परमभक्तीची प्राप्ती होते आणि तो तत्काळ कामभावनेपासून स्वतःची सुटका करून घेतो. ॥ 40 ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहंस्(म्)यां(म्) सं(म्)हितायां(न्)

दशमस्कन्धे पूर्वार्धे रासक्रीडावर्णनं(न्) नाम त्रयस्त्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः।।